महाराष्ट्र शासन

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५

दूरध्वनी क्र ०२०२५५३८८२६ Email ID : diratmams@gmail.com

जा.क्र.कृआ/आत्मा/WDC-२.०/ मा.सु./662/२०२४ दिनांक : 10/०९/२०२४

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,**
**पुणे.**

**विषय:** प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रेरक उपक्रम आणि उत्पादन पद्धती या घटकांच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांबाबत .....

**संदर्भ** - १. मा. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण यांचे कार्यालयाचे पत्र प्रकृयो२०२३/प्रक्र.५१/जल-८, मृद व जलसंधारण दि.०१/०६/२०२३

२. आपल्या कार्यालयाचे पत्र क्रमांक व.पा.वि.यं/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०/उपजीविका/FPO/३९५/२३ दि. २३/०८/२०२३

उपरोक्त विषयांन्वये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अंमलबजावणी आत्मा यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे. उपरोक्तप्रमाणे संदर्भ क्र.१ व २ अन्वये सदर घटकांची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर करणेकरिता आवश्यक मार्गदर्शक सूचनांना मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणीमुळे मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणेबाबत क्षेत्रीय पातळीवरून वारंवार मागणी करण्यात येत होती. सदरची बाब विचारात घेवून योजनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अंशतः बदल करणे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने तयार करण्यात आलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुद्यास आवश्यक ती मान्यता घेणेबाबत आपले स्तरावरून उचित कार्यवाही होणेची, विनंती आहे.

**सोबत:** प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धतीया घटकांचा सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुदा

श्रीम. जगताप
13/9/2024.

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे-१.
12 SEP 2024
आ. क्र. ५९७

(अशोक किरनळ्ळी)
कृषी संचालक, आत्मा
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# सुधारित मार्गदर्शक सुचना

## प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम २.० (PMKSY-WDC 2.0) अंतर्गत पीक उत्पादन पद्धती ( Production System) ही बाब राबविणे.

मृद व जलसंधारणासाठी पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना गेल्या अनेक वर्षापासुन शासनाच्या वेगवेगळ्या माध्यमातुन राबविण्यात येत आहे. यापुढे जाऊन एकुणच जैविक, भौतिक आणि सामाजिक समस्या व त्यावर मात करणेसाठी एकात्मिक पाणलोट विकास या संकल्पनेवर आधारीत विविध योजनांच्या माध्यमातुन शासकीय गुंतवणुक करण्यात आली आहे. यातुन नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापना बरोबरच शाश्वत शेती उत्पादन पद्धती विकसीत करण्याचा उद्देशही ठेवण्यात आला आहे. आता हवामान बदलाच्या पार्श्वभुमीवर पर्यावरणावर होणा-या दुष्परिणामा बरोबरच शाश्वत शेती उत्पादन आणि त्यावर अवलंबुन असलेल्या लोकांच्या उपजिवीकेलाही आव्हान निर्माण झाले आहे. एकुणच सद्यस्थितीत पाणलोट क्षेत्रातील सर्व घटकांना खालील आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे.

१. नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास, जमिनीची घटणारी सुपीकता, घटलेले सेंद्रीय कर्बाचे प्रमाण, भुजलाची घटलेली पातळी.

२. हवामान बदलामुळे वाढलेले तापमान, अनियमीत पाऊस, दुष्काळ, पुर, गारपीट इ. चे वाढलेले प्रमाण आणि त्यामुळे शेती उत्पादनावर होणारा परिणाम.

३. पावसावर अवलंबुन असलेल्या शेतीमध्ये उत्पादकता वाढविण्यावर आणि शेतक-यांचे निव्वळ उत्पन्न वाढविण्यावर आलेल्या मर्यादा.

४. उत्पादन घटल्यामुळे पावसावर अवलंबुन असलेल्या शेती क्षेत्रात गरिबी, कुपोषण, पाण्याचे दुर्भिक्ष आणि जमिनीचा ऱ्हास यामुळे या क्षेत्रात होणारी कमी गुंतवणुक आणि परिणामी भौतिक संसाधनांचा अभाव.

उपरोक्त समस्यावर मात करणेसाठी अशा संवेदनशील क्षेत्रात गुंतवणुक वाढवणे आवश्यक आहे. पाणलोट क्षेत्र विकासाबरोबरच पाणलोटातील लोकांचे प्रतिनिधीत्व करणा-या जबाबदार समुदाय आधारीत संस्था (CBBO) जसे शेतकरी गट, उपभोक्ता गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणे आणि त्यांच्या माध्यमातुन या योजनेतील पीक उत्पादन पद्धती आणि उपजीविका घटक राबविणे आवश्यक आहे.

### १.१ <u>प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम २.० योजनेची उद्दीष्ट्ये</u> -

१. एकात्मिक पाणलोट विकासाच्या माध्यमातुन पर्जन्यश्रेयी /अवर्षणप्रवण क्षेत्र तसेच निकृष्ट झालेल्या जमिनीच्या क्षेत्रातुन उत्पादन क्षमता वाढविणेसाठी लोक सहभागावर आधारीत संस्थांना उपजीविका निर्मिती व पाणलोट विकास शाश्वतता मध्ये प्रभावीपणे सहभागी करुन घेणे.

२. निवड केलेल्या क्षेत्रामध्ये आर्थिक व्यवस्थापन, पर्यावरणशास्त्र, समानता (Economy, Ecology, Equity) या तीन तत्वावर आर्थिक विकासाला चालना देणे.

३. प्रकल्प क्षेत्रातील विविध बाबींचे प्रकल्प अहवाल तयार करुन केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचे अभिसरण करुन पोषण सुरक्षा विषयक लक्ष्य साध्य करणेसाठी पर्यावरण व प्रामुख्याने कृषि उत्पादन प्रणालीवर विशेष लक्ष्य केंद्रीत करणे.

४. आर्थिक विकासाला चालना देणा-या स्थानिक संस्था प्रामुख्याने शेतकरी उत्पादक कंपनी, स्वयंसहाय्यता गट, उपभोक्ता गट, बचत गट यासारख्या संस्थांचे स्थापना व त्यांचे बळकटीकरण करणे.

**१.२ उपरोक्त उद्दीष्ट्ये साध्य करणेसाठी पाणलोट विकास घटक (WDC) – २.० योजनेतुन खालील प्रमुख बाबी राबवयाच्या आहेत-**

१. प्रवेश प्रेरक उपक्रम (EPA)
२. उत्पादन पद्धती ( Production System )
३. उपजीविका पद्धती ( Livelihood Activities )
४. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन ( Natural Resource Management )
५. संस्था व क्षमता बांधणी ( Institutional & Capacity Building)

या योजनेत सर्व घटक मिळुन प्रति हेक्टर आर्थिक मापदंड खालीलप्रमाणे आहेत,

अ) डोंगरी भाग - रु. २८,०००/-
ब) उर्वरित भागासाठी - रु. २२,०००/-

वर नमुद घटकातील अ.क्र. २ उत्पादन पद्धती (Production System) ही बाब कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत राबविण्यास मा. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण यांचे कार्यालयाचे पत्र क्र.प्रकृयो२०२३/ प्रक्र.५१ / जल-८, मृद व जलसंधारण विभाग, दि. १/०६/२०२३ नुसार मान्यता देण्यात आली आहे. उत्पादन पद्धती ( Production System ) घटक राबविण्या बाबतच्या मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे निर्गमीत करण्यात येत आहेत.

**१.३ उत्पादन पद्धती कार्यक्रम (Production System) –**

पाणलोट विकास घटक (WDC) -२.० अंतर्गत उत्पादन पद्धती ( Production System ) या बाबीसाठी प्रकल्प किमतीच्या १५ टक्के रक्कम निर्धारीत करण्यात आली आहे. या योजनेतुन पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामांमुळे नैसर्गिक संसाधनांचे योग्य व्यवस्थापन होऊन मृद व जलसंधारणाचे उद्दीष्ट साध्य करण्याबरोबरच उपलब्ध नैसर्गिक संसाधनांमधुन शाश्वत शेती पद्धती विकसीत होणे महत्वाचे आहे. यासाठी "उत्पादन पद्धती" या घटकातुन कृषी विकास व विस्ताराचे काम करणे अपेक्षीत आहे. या कार्यक्रमामध्ये उत्पादनापासुन विक्री व्यवस्था आणि ग्राहकांपर्यंत संपुर्ण मुल्यसाखळी विकसीत करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

उत्पादन पद्धती या घटकातुन वैयक्तीक स्वरुपाचा लाभ दिल्यास पाणलोट विकास निधीमध्ये (WDF) मध्ये लाभार्थी स्वहिस्सा म्हणुन सर्वसाधारण लाभार्थ्यासाठी लाभ दिलेल्या रकमेच्या २० टक्के तर अनुसुचीत जाती / जमाती प्रवर्गाच्या लाभार्थ्यासाठी लाभ दिलेल्या रकमेच्या १० टक्के रक्कम स्वहिस्सा स्वरूपात भरणे आवश्यक आहे. तथापि, समुदाय आधारीत संस्था उदा. नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या इ. लाभार्थी असल्यास लाभार्थी स्वहिस्सा भरण्याची आवश्यकता नाही.

**अ) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद १९.२.१३ नुसार या घटकातुन खालील बाबीवर उत्पादन पद्धती आधारित उपक्रमांचा समावेश अपेक्षित आहे -**

१) एकात्मिक शेती पद्धती (Integrated Farming System)
२) सेंद्रीय / नैसर्गिक शेती (Organic & Natural Farming)
३) कृषि हवामान व पिक सल्ले (Agro-met Advisories)
४) आकस्मिक पीक नियोजन (Crop Contigency Planning)
५) संरक्षित सिंचन ( Protective Irrigation)
६) सुक्ष्म सिंचन ( Micro Irrigation)
७) अपारंपारिक ऊर्जा (Renewable Energy)
८) पशुसंवर्धन (Livestock)
९) मत्स्यपालन ( Fisheries)
१०) औजारे बँक (Custom Hiring Center)
११) निविष्ठा पुरवठा केंद्र (Input Sale Outlet)
१२) जैविक व वनस्पतीजन्य निविष्ठा उत्पादन केंद्र (Bio- Input Production Center)

उपरोक्त बाबींच्या अधिक विश्लेषणात्मक माहितीसाठी पाणलोट विकास घटक (WDC) -२.० च्या मुळ इंग्रजी मार्गदर्शक सुचनांमधील १९.२.१३ चे अवलोकन करावे.

**ब) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद १९.२.१४ नुसार या घटकातुन शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत एकुणच मुल्यसाखळी विकासावर भर देणे अपेक्षीत आहे -**

यामध्ये उत्पादन पुर्व, उत्पादना दरम्यान आणि काढण्योत्तर अशा सर्व स्तरावर काम करणे अपेक्षीत आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना आवश्यक पायाभुत सुविधा (साठवणुक, वाहतुक इ.), प्राथमिक कृषि प्रक्रियेसाठी प्रशिक्षण, पर्यायी बाजारासाठी प्रशिक्षण (ऑनलाइन विक्री, थेट विक्री इ.) घाऊक खरेदीदारांसोबत थेट जोडणी (निर्यातदार, प्रक्रिया उद्योग इ.) या बाबींवर भर देणे आवश्यक आहे.

**केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे आणि राज्यातील मुल्यसाखळी विकासाचे सध्या सुरु असलेले काम लक्षात घेऊन या मार्गदर्शक सुचना तयार करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत -**

१. या घटकातील उपलब्ध तरतुदीनुसार पाणलोट क्षेत्रात प्रवेश प्रेरक उपक्रमातुन स्थापित किंवा अस्तित्वात शेतकरी उत्पादक कंपनी आणि आत्मा नोंदणीकृत शेतकरी गटांसाठी मुल्यसाखळी विकास उपप्रकल्पांच्या माध्यमातुन खर्च करावयाचा आहे.
२. असे मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प तयार करताना उपरोक्त “अ” आणि “ब” मधील घटकांचा समावेश करुन उपप्रकल्प तयार करावेत.
३. या योजनेतुन प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत (EPA) स्थापित अथवा प्रकल्प क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या आणि प्रवेश प्रेरक उपक्रम(EPA) या बाबीचा लाभ मिळालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी, उत्पादन पद्धती (Production System) या घटकांतर्गत एकुण उपलब्ध तरतुदीच्या ४० टक्के निधीचा

लाभ द्यावा आणि उर्वरीत ६० टक्के निधीचा लाभ आत्मा नोंदणीकृत शेतकरी गटांच्या उपप्रकल्पांना द्यावा. उपरोक्त प्रमाणे शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपनी यांचे उपप्रकल्पावरील खर्च होवूनही रक्कम शिल्लक राहत असल्यास सदर निधीमधून शेतकरी प्रशिक्षण व अभ्यासदौरा या बाबीकरिता आत्मा योजनेच्या मापदंडानुसार खर्च करता येईल. यासाठी कृषी संचालक आत्मा यांचे मान्यतेने कार्यवाही करावी.

उत्पादन पध्दतीसाठी उपलब्ध निधीच्या २०% निधी खालील मुददा क्र.७ नुसार खर्च करता येईल. सदरचा खर्च गट व शेतकरी उत्पादक कंपनी या दोन्हींवर करता येईल. तथापि, द्विरुक्ती टाळणे आवश्यक राहील.

४. शेतकरी उत्पादक कंपनीचे मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प हे प्रचलित केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचे मापदंड विचारात घेऊन तयार करावेत. सदर प्रकल्पासाठी अनुदानाचा दर अधिकतम ६० टक्के किंवा जास्तीत जास्त १.०० कोटीच्या मर्यादेत राहील. अपवादात्मक परिस्थितीत प्रचलित केंद्र अथवा राज्य शासनाच्या योजनेच्या बाहेरील घटकाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास (मापदंड उपलब्ध नसल्यास) अशा घटकाला संबंधित शासकीय विभागाची तांत्रिक मान्यता घेऊन मापदंड ठरवावेत.

५. मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प मंजुरीचे पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्रांतर्गत (WCDC) समितीला राहतील. प्रकल्प संचालक आत्मा या समितीमध्ये उपप्रकल्प मंजुरीसाठी सादर करतील.

६. आत्मा नोंदणीकृत गटांना (प्रकल्प कार्यक्षेत्रातील स्थापित/ नवनिर्मित परंतु सक्रीय कार्यरत शेतकरी गट) उपलब्ध ६० टक्के निधीतुन गटशेती योजनेच्या धर्तीवर लाभ द्यावा. तथापि, गटातील शेतजमिनीचे क्षेत्राच्या प्रमाणात अधिकतम देय अनुदान खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | भौगोलिक क्षेत्र | गटातील शेतकरी संख्या | गटातील शेतक-यांचे एकत्रित किमान शेतजमिनीचे क्षेत्र (हेक्टर) | मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पाला अधिकतम देय अनुदान (रु. लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण वगळता उर्वरीत महाराष्ट्र | किमान २० अधिकतम ४९ | २५ | ८.०० |
| २ | कोकण विभाग | किमान २० अधिकतम ३९ | १० | ५.०० |
| ३ | कोकण वगळता उर्वरीत महाराष्ट्र | किमान ५० किंवा त्याहुन अधिक | ५० | १६.०० |
| ४ | कोकण विभाग | किमान ४० किंवा त्याहुन अधिक | २० | १०.०० |

७. मुल्यसाखळी विकास शाळा (VCDS) या आत्मा योजनेच्या मार्गदर्शक सूचना-२०१८ मधील मापदंडानुसार राबविण्यात याव्यात. यामध्ये गरजेवर आधारित प्रात्यक्षिक, शेतीशाळा, प्रशिक्षण,

अभ्यासदौरे, किसान गोष्टी व शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद या बाबीसाठी कंपनी व गट यांना उपप्रकल्पासाठी देय अनुदानाच्या अधिकतम २० टक्के पर्यंत रक्कम वापरता येईल. या बाबीकरिता १०० टक्के अनुदान देय आहे. सदर बाबीचे नियोजन कंपनी व गट यांचे आवश्यकतेनुसार प्रकल्प संचालक आत्मा यांनी पाणलोट समिती आणि PIA यांचे मदतीने करावे. यासाठी जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्रांतर्गत (WCDC) समितीची मान्यता / कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. हा लाभ समुदाय आधारीत संस्थेला द्यावयाचा असल्याने स्वःहिस्सा पाणलोट विकास निधीमध्ये (WDF) भरण्याची आवश्यकता नाही.

८. उपप्रकल्पाचा गोषवारा परिशिष्ट "अ" प्रमाणे असावा.

९. उपप्रकल्पाची अंमलबजावणी क्षेत्रीय पातळीवर प्रकल्प संचालक आत्मा यांनी सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM), तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM), पाणलोट विकास पथक (WDT) आणि प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांचे मदतीने करावी. पाणलोट विकास पथकातील कृषी तज्ञ प्रकल्प संचालक आत्मा यांचे थेट नियंत्रणाखाली काम करतील. कृषि तज्ञ प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांच्या कार्यालयात प्रकल्प संचालक आत्मा यांच्या सूचनेनुसार कार्यरत राहतील. कृषी तज्ञांच्या सेवा प्रकल्प संचालक आत्मा जिल्हास्तरावर सुद्धा घेऊ शकतील

१०. एका पाणलोटात आत्मा नोंदणीकृत शेतकरी गटांसाठी उपलब्ध तरतुदी पेक्षा अधिकचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास पाणलोट समितीने लॅाटरी काढुन गटांची निवड करावी (अधिकतम २५ गटांना लाभ देता येईल).

११. कंपनी/गटांच्या मूल्य साखळी विकास उपप्रकल्प प्रस्तावांना पाणलोट समितीची मान्यता प्राप्त करून घेण्याची कार्यवाही PIA करतील. सदर उपप्रकल्प प्रस्तावांची प्राथमिक तपासणी करून त्यामधील नाविन्यपूर्ण, वैविध्यपूर्ण उपप्रकल्प प्रस्ताव PIA, प्रकल्प संचालक आत्मा यांना मंजुरीसाठी सादर करतील. PIA यांचेमार्फत प्राप्त झालेले प्रस्ताव प्रकल्प संचालक आत्मा मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्रांतर्गत (WCDC) समितीस सादर करतील. उपप्रकल्पाची अंमलबजावणी जलदगतीने होणेच्या अनुषंगाने सदर प्रस्तावांना मान्यता प्राप्त करून घेणेकरिता WCDC ची बैठक तातडीने बोलाविणेची कार्यवाही सदस्य सचिव करतील. प्रकल्प संचालक आत्मा जिल्हास्तरीय समितीने (WCDC) मान्यता प्रदान केलल्या उपप्रकल्प प्रस्तावांचे आवश्यक त्या कागदपत्रासह सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त करून घेतील. सदर अहवालांची छाननी करून परिपूर्ण असे सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्प संचालक आत्मा हे जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्रांतर्गत (WCDC) समितीस अंतिम मान्यतेकरीता सादर करतील. WCDC ने अंतिम मान्यता दिलेल्या उपप्रकल्पास प्रकल्प संचालक आत्मा कार्यारंभ आदेश देतील. सविस्तर प्रकल्प अहवाला सोबत सादर करावयाचा अर्जाचा नमूना (परिशिष्ट-ब) प्रमाणे असावा.

१२. मुल्यसाखळी विकासाच्या अशा उपप्रकल्पामध्ये अभिसरणाच्या माध्यमातुन अन्य योजनांचा लाभ घेता येईल. अन्य योजनांचा लाभ घेतल्यास त्याबाबतचा तपशील प्रकल्प अहवालात नमुद करावा. परंतु यासाठीची द्विरुक्ती टाळावी.

१.४ <u>पिक उत्पादन पद्धती मधुन शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) साठी राबविण्याचा कार्यक्रम</u> -

- उत्पादन पद्धती साठी उपलब्ध होणा-या एकुण अनुदानापैकी किमान ४० टक्के रक्कम शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) यांचे मार्फत घ्यावयाच्या विविध उपक्रमासाठी निर्धारीत करण्यात यावी.
- अनुदानाची परिगणना करणेसाठी वस्तु आणि सेवा कर (GST) सह द्यावयाच्या अनुदानाची परिगणना करण्यात येईल.
- प्रकल्प संचालक आत्मा यांचे मार्फत विविध उत्पादन पद्धतीचे प्रकल्प तयार करणेसाठी मार्गदर्शन करण्यात येईल किंवा आवश्यकता असल्यास या बाबीसाठी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्वतंत्र सल्लागाराच्या मदतीने ( CA इ.) प्रकल्प अहवाल तयार करु शकेल.
- FPC साठी उत्पादन पद्धती मधुन राबवायच्या कार्यक्रमासाठी FPC मध्ये कोकण वगळुन इतर महाराष्ट्रासाठी प्रवेश प्रेरक उपक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केल्याप्रमाणे किमान १५० तर कोकण विभागासाठी किमान १०० सभासद असणे आवश्यक आहे.
- या कार्यक्रमामध्ये अनुदानाची द्विरुक्ती होऊ नये (एकाच बाबीसाठी दुस्-या योजनेतुन एकाहुन अधिक वेळा अनुदान घेवु नये.) याची काळजी सबंधित शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) चे अध्यक्ष, PIA यांनी घ्यावी. यासाठी संबंधित तालुकास्तरीय अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) घेण्यात यावे.

१.५ <u>पीक उत्पादन पद्धती मधुन आत्मा अंतर्गत नोंदणी केलेल्या गटांसाठी राबविण्याचा कार्यक्रम</u> -

- उत्पादन पद्धती साठी उपलब्ध होणा-या एकुण अनुदानापैकी किमान ६० टक्के रक्कम शेतकरी गट यांचेमार्फत घ्यावयाच्या विविध उपक्रमासाठी निर्धारीत करण्यात यावी.
- योजने अंतर्गत द्यावयाच्या अनुदानाची परिगणना करणेसाठी वस्तु आणि सेवा कर (GST) सह परिगणना करण्यात येईल.
- पायाभुत सुविधा अंतर्गत सामुहिक औजारे / यंत्रसामुग्री बँक निर्मिती, सामुदायिक संकलन व साठवण केंद्र, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, विपणन व्यवस्था, सामुहिक तत्वावर नियंत्रित शेती, काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या सामुहिक सुविधा, सामुहिक सिंचन सुविधा, चारा प्रक्रिया व दुग्धव्यवसाय प्रक्रिया सुविधा इत्यादी कार्यक्रम शेतकरी गटा मार्फत प्रकल्प आधारीत राबविता येतील.
- प्रकल्प संचालक आत्मा यांचे मार्फत विविध उत्पादन पद्धतीचे प्रकल्प तयार करणेसाठी मार्गदर्शन करण्यात येईल किंवा तसेच आवश्यकता असल्यास या बाबीसाठी शेतकरी गट स्वतंत्र सल्लागार संस्थेच्या मदतीने प्रकल्प अहवाल तयार करेल.
- आत्मा नोंदणीकृत गटांसाठी उत्पादन पद्धती मधुन राबवायच्या कार्यक्रमासाठी शेतकरी गटामध्ये कोकण वगळुन इतर महाराष्ट्रासाठी प्रवेश प्रेरक उपक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केल्याप्रमाणे किमान क्षेत्र २० हे. तर कोकण विभागासाठी किमान क्षेत्र १० हे. असणे आवश्यक आहे. तथापि, गटातील शेतजमिनीचे क्षेत्राच्या प्रमाणात अधिकतम देय अनुदान वरील अनुक्रमांक ६ नुसार राहील.

- पाणलोटा अंतर्गत उत्पादन पद्धती या बाबीसाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी (POCRA) प्रकल्पांतर्गत निश्चीत केलेले प्रकल्प या योजनेच्या मापदंडानुसार राबविता येतील. POCRA प्रकल्पांतर्गत समाविष्ठ घटक/बाबींची यादी सोबत सहपत्रीत केली आहे. (परिशिष्ट "क")
- या कार्यक्रमामध्ये अनुदानाची द्विरुक्ती होऊ नये (एकाच बाबीसाठी दुस्-या योजनेतुन एकाहुन अधिक वेळा अनुदान घेवु नये.) याची काळजी सबंधित शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) चे अध्यक्ष, PIA यांनी घ्यावी. यासाठी संबंधित तालुकास्तरीय अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) घेण्यात यावे.

**१.६ <u>अनुदान वितरण पद्धत</u>** -

उत्पादन पद्धती या घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपप्रकल्पाकरिता कंपनी / गटास एकुण प्रकल्प किंमतीच्या ६० टक्के अनुदान (रु.१ कोटी मर्यादेत) देय राहील. उर्वरित ४० टक्के रकमेची उभारणी गट /कंपनीने स्व:हिस्सा व बँक कर्जाद्वारे करणे आवश्यक आहे. या घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपप्रकल्पासाठी बँक कर्ज आवश्यक असल्यास त्याच्या मंजुरीसाठी सादर करावयाचे शिफारसपत्र प्रकल्प संचालक आत्मा यांनी द्यावे.

ज्या घटकांसाठी गटाने /कंपनीने वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य घेतले असेल त्या घटकांचा अर्थसहाय्याचा प्रस्ताव बँकेने मंजूर केल्यानंतर मंजूर प्रस्तावाप्रमाणे गटाने / कंपनीने स्वनिधी (२० %) बँकेत जमा करावा.

स्वनिधी जमा झाल्याचे व कर्ज मंजूरीचे बँकेचे पत्र घेऊन त्या घटकासाठी खालील अनुक्रमांक १, २ व ३ प्रमाणे देय होणारे अनुदान कंपनीच्या/गटाच्या बँक/कर्ज खात्यात जमा करण्याची कार्यवाही प्रकल्प संचालक आत्मा यांनी करावी.

<u>या घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपप्रकल्पाचे अनुदान वितरण खालीलप्रमाणे तीन हप्त्यात करण्यात येईल.-</u>

१. **पहिला हप्ता** -

कंपनी अथवा गटाने स्व:हिस्याची ५० टक्के रक्कम बँकेत भरल्यानंतर व बँक कर्ज मंजुर झाल्यानंतर किंवा उपप्रकल्पासाठी बँकेचे अर्थसहाय्य घेणार नसल्यास स्व:हिस्याची ५० टक्के रक्कम (उदा: रु.१० लाख किमतीचा उपप्रकल्प असल्यास स्व:हिस्सा ४० टक्के रक्कमेपैकी ५० टक्के म्हणजे रु. २ लाख ) बँक खात्यात जमा केल्यानंतर योजनेचे ५० टक्के (एकुण देय अनुदानाच्या ५० टक्के रक्कम) अनुदान वितरीत करावे.

२. **दुसरा हप्ता** -

पहिला हप्त्याद्वारे वितरीत निधी, स्व:हिस्सा व बँक कर्जाद्वारे जमा रक्कम अशा एकुण उभारणी केलेल्या रकमेच्या ७५ टक्के रक्कम खर्च झाल्यानंतर दुसरा हप्ता (एकुण देय अनुदानाच्या ४०टक्के रक्कम) देय होईल. परंतु, दुसरा हप्ता अदा करणेपुर्वी स्व:हिस्याची उर्वरीत ५० टक्के रक्कम कंपनी अथवा गटाने बँकेत भरावी किंवा बँक कर्ज पूर्णत: वितरीत झालेले असावे.

३. **तिसरा हप्ता**

प्रकल्प संचालक आत्मा, तसेच कर्जाचे घटक ज्या विभागाशी संबंधीत आहेत त्या विभागाचे अधिकारी, बँकेचे अधिकारी त्याचबरोबर आवश्यकता असेल तेथे शासकीय मान्यताप्राप्त मुल्यांकनकर्ते यांनी मंजूर

सविस्तर प्रकल्प आराखड्याप्रमाणे काम पूर्ण झालेनंतर प्रकल्पाचे मुल्यांकन करावे व त्याआधारे देय अनुदानाची निश्चिती करावी. पहिल्या व दुसऱ्या हप्त्याद्वारे वितरीत निधी,स्व:हिस्सा व बँक कर्जाची रक्कम पुर्णत: खर्च झाल्यानंतर योजनेचे उर्वरित अनुदान (एकुण देय अनुदानाच्या १० टक्के रक्कम) वितरीत करावे.

ज्या उपप्रकल्पासाठी गट/कंपनीने बँकेकडून अर्थसहाय्य घेतलेले नाही अशा उपप्रकल्पांच्या उभारणीनंतर त्यांचे झालेल्या कामाची मोका तपासणी करून मुल्यांकनाप्रमाणे/मापदंडाप्रमाणे कामाच्या प्रगतीनुसार वरीलप्रमाणे पहिला, दुसरा व तिसऱ्या हप्त्यातील अनुदान प्रकल्प संचालक आत्मा यांनी गट/कंपनीस बँक खात्याद्वारे अदा करावे.

**१.७ <u>सनियंत्रण व मुल्यमापन</u> –**

उत्पादन पद्धती या घटकाच्या सनियंत्रण मुल्यमापनासाठी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या यंत्रणेमार्फत कार्यवाही केली जाईल. याबाबत झालेल्या कामाची तपासणी अनुदान वितरीत करण्यापुर्वी करावी. अधिकारीनिहाय करावयाच्या तपासणीचे प्रमाण खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | अधिकारी | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) | १०० टक्के |
| २ | प्रकल्प उपसंचालक आत्मा,प्रकल्प संचालक आत्मा यांचे कार्यालयातील | २५ टक्के |
| ३ | प्रकल्प संचालक आत्मा | १० टक्के |

## परिशिष्ट – "अ"

### उपप्रकल्प गोषवारा

| अ.क्र. | बाब | युनिट (संख्या/हे.) | मापदंड (युनिट कॉस्ट) | कोणत्या शासकिय योजनेचे मापदंड वापरले | राबवण्याचे एकुण युनिट | राबवायाच्या युनिट ची एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

| युनिटच्याएकुण खर्चाची वर्गवारी | | | | युनिट राबविण्याचा कालावधी महिना / वर्ष | युनिट राबविण्यास जबाबदार कोण? |
|---|---|---|---|---|---|
| ८ | | | | ९ | १० |
| WDC २.० | FPC /लाभार्थी हिस्सा | बँक कर्ज | इतर | | |
| | | | | | |
| | | | | | |

## "परिशिष्ट -क"

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी (POCRA) प्रकल्पांतर्गत समाविष्ट घटक/बाबी

- भाडे तत्वावर कृषी अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे
- एकात्मिक पॅक हाऊस / कृषि उत्पादनाचे संकलन केंद्र
- फळ पिकवणी केंद्र
- भाजीपाला / फळ प्रक्रिया केंद्र
- औषधी / सुगंधी वनस्पती प्रक्रिया युनिट
- शीतगृह
- गोदाम व छोटे वेअर हाऊस
- धान्य प्रक्रिया युनिट (स्वच्छता / प्रतवारी युनिटसह)
- कडधान्य मिल (दाल मिल)
- अन्न प्रक्रिया युनिट
- तेल गाळप युनिट
- मुरघास युनिट
- मसाले युनिट
- हळद प्रक्रिया युनिट
- दुध प्रक्रिया युनिट
- निंबोळी अर्क युनिट
- कांदा चाळ (सामुहिक)
- संपूर्ण बीजप्रक्रिया युनिट (संयंत्रे, गोडाऊन/शेड सह)
- इतर कृषि व्यवसाय
    - रेशिम युनिट
    - ड्रोन युनिट (आवश्यक उपकरणांसह)
    - बायोमास प्रक्रिया (ब्रिकेट, पॅलेटस)
    - बायोचार युनिट
    - बोटुकली निर्मिती युनिट

"परिशिष्ठ - ब"

अर्जाचा नमुना

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन - कृषि विभाग

## प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० (PMKSY-WDC २.०) अंतर्गत उत्पादन पद्धती (Production System) करिता प्रकल्पांतर्गत शेतकरी गट/ शेतकरी उत्पादक कंपनीयांनी अर्थसहाय्यासाठी करावयाचा अर्ज

==================================================

प्रति,

प्रकल्प संचालक आत्मा ,

जिल्हा ..............................

**महोदय,**

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० (PMKSY-WDC २.०) अंतर्गत उत्पादन पद्धती (Production System) करिता प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गट/ शेतकरी उत्पादक कंपनी ---------------------- प्रक्रिया उद्योगामध्ये गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता प्रकल्पांतर्गत खालील घटकाकरिता निवड होणेसाठी विनंती अर्ज सादर करत आहे.

**घटकाचे नाव**- ..........................................................................................................

**घटकाचा तपशील**- ..........................................................................................................

| अ) अर्ज करणाऱ्या गटाचा/ कंपनीचा तपशील | |
|---|---|
| १. गटाचे/ कंपनीचे नाव - | |
| २. गटाचा प्रकार (FPC/FPO/SHG/FIG/इतर) - | |
| ३. ज्या यंत्रणे/ कार्यालयाकडे नोंदणी झाली आहे त्या यंत्रणे/कार्यालयाचे नाव | |
| ४. नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| ५. गटाचे कार्यक्षेत्र (गावाची संख्या व तालुक्यांची नावे व जिल्हा) - | |
| ६. गटातील एकूण सभासद संख्या - | स्त्रिया ☐ पुरुष ☐ एकूण ☐ |
| | सीमांत शेतकरी (१ हे. पेक्षा कमी)-<br>लहान शेतकरी (२ हे. पेक्षा कमी)-<br>मोठे शेतकरी (२ हे. पेक्षा जास्त )- |
| ७. नोंदणी करताना गटाचा पूर्ण पत्ता- | गाव.................. पोस्ट.......................<br>तालुका............जिल्हा......................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |

| | |
|---|---|
| ८. दुरध्वनी क्र. (STD कोड सह) - | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. मुख्य प्रवर्तकाचे नाव - | |
| १०. मुख्य प्रवर्तकाचा भ्रमणध्वनी क्र.- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११.संपर्कासाठी ई-मेल आयडी- | |
| १२. गटाचे सचिव /मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे नाव | |
| १३. गटाचे सचिव /मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा भ्रमणध्वनी क्र.- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| | |
| **प्रस्तावित केलेल्या व्यवसायाबाबतचा पूर्वानुभव -** | |
| अ. प्रशिक्षण घेतले आहे का ? | |
| ब. असल्यास कोठे ? | |
| क. अभ्यास दौरा/ भेट दिली आहे का ? कोठे ? | |
| प्रस्तावित प्रकल्पाचा एकूण खर्च (रु.) | |
| प्रकल्पांतर्गत वार्षिक रोजगार निर्मिती (मनुष्यदिन) संख्या | |
| हंगाम | |
| कायमस्वरूपी | |
| तांत्रिक | |
| अतांत्रिक | |

परिसरातील सुरु असलेल्या याच प्रकारच्या इतर उद्योगाबाबत थोडक्यात तपशील-

**ब) प्रस्तावित प्रकल्पाचा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव- | | | |
| प्रकल्पाचे ठिकाण | गाव - | तालुका - | जिल्हा - |
| गटाच्या मालकीची जमिन (हे./आर) -<br>सर्व्हे नंबर - | | | |
| यापैकी मागणी केलेल्या प्रकल्पासाठी उपलब्ध होणारी जमिन (हे./आर) - | | | |
| सदर जमिन औद्योगिक वापरण्यास परवानगी आहे का? | | | |
| आवश्यक यंत्रसामुग्री- | तपशील | (भारतात उपलब्ध/ भारता बाहेरील) | |
| | १......... | | |
| | २......... | | |
| | ३......... | | |
| आवश्यक तंत्रज्ञान - | तपशील | (भारतात उपलब्ध/ भारता बाहेरील) | |
| | १......... | | |
| | २......... | | |
| | ३......... | | |
| क्षमता- | प्रतिदिन- | प्रतिवर्ष- | |
| प्रकल्पाची विद्युत आवश्यकता (KV) - | | | |
| विद्युत उपलब्धता (KV) | | | |
| उभारणी केलेल्या उद्योगातून बाहेर पडणाऱ्या प्रदुषित पाण्यावर प्रक्रियेची तरतूदी बाबत तपशील | | | |
| प्रकल्पाच्या ठिकाणापर्यंत वाहतुकीसाठी प्रमुख रस्त्यांबाबतचा तपशील - | | | |
| गोदामाची उपलब्धता / साठवणूक व्यवस्था | स्वतःचे | भाड्याचे | |
| मनुष्यबळ आवश्यकता (संख्या) | तांत्रिक - | अतांत्रिक - | |
| मनुष्यबळ उपलब्धता (संख्या) | तांत्रिक - | अतांत्रिक - | |
| मनुष्यबळ आवश्यकता (संख्या) | हंगामी - | कायमस्वरूपी - | |
| मनुष्यबळ उपलब्धता (संख्या) | हंगामी - | कायमस्वरूपी - | |
| प्रकल्पाचा लाभ अल्प/ अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना होतो का ? | | होय / नाही | |

**उत्पादीत मालाला बाजारपेठे मध्ये मागणी असलेबाबत थोडक्यात विवेचन**

| | |
|---|---|
| अ. कोणती बाजारपेठ ? | |
| ब. बाजारपेठेची अंदाजीत मागणी | |
| क. वाहतूक व्यवस्था | |
| ड. मागणीचा कालावधी | |

| क) प्रस्तावित प्रकल्पाचा खर्च | | आवश्यकता | अंदाजित रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | | |
| १. | जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २. | बांधकाम (चौ.मी.) | | |
| ३. | यंत्रसामुग्री व साधनसामुग्री | | |
| ४. | विद्युतीकरण | | |
| ५. | फर्निचर | | |
| ६. | संगणक/ प्रिंटर्स (संख्या) | | |
| ७. | प्राथमिक प्रकल्प सुरु करणे करिता आवश्यक खेळते भांडवल (रु.) | | |
| ८. | इतर भांडवल (रु.) | | |
| | एकूण | | |
| निधी उपलब्धता | | स्व हिस्सा (रु.) | |
| | | बँक कर्ज | |
| | | प्रकल्पातून अंदाजित मिळणारे अनुदान (रु.) | |
| | | प्रस्तावित बँकेचे नाव व शाखा | |
| | | यापूर्वी घेतलेले कर्ज (रु.) | |
| | | शिल्लक परतफेड (रु.) | |

| ड) प्रकल्प आराखडयामध्ये खालील बाबी आवश्यक आहेत. | |
|---|---|
| १. Cash Flow Statement | |
| २. Net present value statement | |
| ३. चालू कर्जाच्या परतफेडी बाबत | |
| ४. | |
| ५. | |
| **संस्थात्मक दुवे** | |
| तंत्रज्ञान / R & D संस्था | |
| लहान शेतकरी व मागासवर्गीय यांच्यातील दुवा व त्यांना यांबाबत प्रशिक्षण, विद्यापीठे इ. | |
| व्यवसाय आराखड्यामधे खालील बाबींबाबत तपशील असणे आवश्यक आहे . | |
| १. सध्याचे बाजार | २. भविष्यात मागणी |
| ३. विपणन धोरण | ४. बाजार संबंध |
| ५. दळणवळण | ६. इन्शुरन्स बाबत तपशील |
| **अमंलबजावणी वेळापत्रक** | |
| प्रकल्पाचे टप्पे, अमंलबजावणी तारीख (Bar charts, Milestone Charts सोबत द्यावे) | |
| तंत्रज्ञान व व्यवस्थापकीय चा तपशील (कार्य, देखभाल, वित्त, विपणन इ.) आवश्यकता व उपलब्धता बाबत सविस्तर तपशील द्यावा | |

१. मला /आम्हाला कल्पना आहे की, सदर घटकांतर्गत प्रकल्पातून लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत बँकेची /वित्तीय संस्थेचे कर्ज घेतल्यास सदर नोंदणीकृत बँक /वित्तीय संस्था स्वतंत्रपणे प्रकल्पाची तांत्रिक दृष्ट्या ( technical feasible) व आर्थिक दृष्ट्या व्यवहार्थ ( financial viable) तपासून त्याचे धोरणात्मक प्रस्ताव मंजूर करतील. त्यासाठी सदर नोंदणीकृत बँक /वित्तीय संस्थेची आवश्यक करारनामा करण्यास आम्ही तयार आहोत. सदर करारनाम्यात प्रकल्पाच्या प्रापन, आर्थिक, पर्यावरणीय, तसेच सामाजिक आराखड्यातील तरतुदी प्रमाणे

कार्यवाही करण्याचा उल्लेख असेल. त्याच धर्तीवर प्रकल्प संचालक आत्मा यांच्यासोबत आवश्यक करारनामा करण्यात येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यावर प्रकल्प अधिकारी व नोंदणीकृत बँक वित्तीय संस्था यांनी तपासणी करून शिफारस केल्याप्रमाणे अनुदान बँकेकडे ( back ended subsidy ) कर्ज खाती जमा केले जाईल.

२. सदर घटकासाठी माझी / आमची निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण केल्या नंतरच अनुदान देय राहील.

३. सदरचे काम विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला/आम्हाला जाणीव आहे.

४. सदर बाबीचा लाभ घेत असतांना वा त्यानंतर गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित घटकासाठी मिळालेले अनुदान सव्याज वसूल केले जाईल. याची मला/आम्हांला स्पष्ट जाणीव आहे.

५. प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना प्रकल्प व अनुषंगिक बाबी तपासणीसाठी माझी / आमची संमती राहील. तसेच त्यांना या कामासाठी सहकार्य करण्यात येईल.वरील सर्व माहिती आमच्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ :-

दिनांक -

शेतकरी उत्पादक कंपनीच्या/गटाच्या मुख्य प्रवर्तकाची सही